
ISSN 2320 4439
RNI No MAHAUL 03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME : III ISSUE III Oct - Dec 2019



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor **Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

Scanned by TapScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 42 | "राजन खान यांचे साहित्य लेखन" | नाईनवाड रमेश नागोराव | 195-197 |
| 43 | हिन्दी साहित्य और हासिए का समाज | डॉ.बालकवि लक्ष्मण सुरंजे, शर्मा संतोष कुमार | 198-201 |
| 44 | डॉ.प्रभा खेतान के उपन्यास में अभिव्यक्त स्त्री पात्रो की विवेचना | प्रा.डॉ.उत्तम जाधव | 202-204 |
| 45 | भुक्तिपर्व उपन्यास मं दलित संवेदना | प्रा.डॉ.विष्णु भ. गव्हाणे | 205-207 |
| 46 | स्वतंत्रता संग्राम में भारतेन्दु हरिश्चन्द्र का योगदान' | प्रा.डॉ.सुचिता जगन्नाथ गायकवाड | 208-213 |
| 47 | हिन्दी उपन्यास साहित्य में चित्रित नारी | डॉ.सय्यद अमर फकिर | 214-118 |
| 48 | शेतकरी महिलांचे वास्तव : एक अभ्यास | डॉ.अरुंधती पाटील | 119-223 |
| 49 | छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक आर्थिक नीतीचे अवलोकन | डॉ.संतोष तु. कुटे | 224-229 |
| 50 | वसंतराव नाईक यांचे कृषी आर्थीक आणि ग्रामीण | डॉ.अशोक कोरडे | 230-235 |
| 51 | पर्यटन व पर्यटनाचे प्रकार | डॉ.आर.सी.फाटक | 236-239 |
| 52 | छत्रपती शिवरायांनी जोसपलेली सामाजिक बांधिलकी | श्री.चौधरी अरुण भिमराव | 240-242 |
| 53 | लोकराजा - शिवछत्रपती | डॉ.फुलचंद सुर्यभान दुधभाते | 243-245 |
| 54 | साहित्य सम्राट छत्रपती संभाजी महाराज' | डॉ.शेख हुसेन इमाम | 246-247 |
| 55 | सह्याद्रीतील महादेव कोळी जमातीचा पूर्वेतिहास | प्रा.डॉ.केदारनाथ मालु | 248-250 |
| 56 | पर्यावरण आपत्ती व्यवस्थापन : भूकंप | प्रा.डॉ.बबन बोबडे | 251-254 |
| 57 | महाराष्ट्रातील सुगम संगीताचे स्वरुप आणि वाटचाल | प्रा.केदार रविंद्र केंद्रेकंर | 255-259 |
| 58 | गांधीवाद आणि आंतरराष्ट्रवाद | प्रा.डॉ.मानवले उत्तम हुसनाजी | 260-262 |
| 59 | भारतीय संघराज्यात छोट्या राज्यांची निर्मितीची गरज' | प्रा.डॉ.वसंत आबासाहेब खरात | 263-268 |
| 60 | आदिवासी समाज जिवन आणि सांस्कृतिक जिवन : एक अभ्यास | प्रा.डॉ.प्रकर्ष सुभाषराव देशमुख | 269-273 |
| 61 | ग्रामीण विकासाचे प्रश्न आणि आव्हाने | प्रा.डॉ.नवनाथ एस. शिंदे | 274-277 |
| 62 | स्त्री-भ्रुणहत्या : एक सामाजिक समस्या | प्रा.गायकवाड पी.के. | 278-280 |
| 63 | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम | प्रा.राठोड बी.जे. | 281-283 |
| 64 | "योग आणि ध्यान" | प्रा.डॉ.सुरेश एम. नलावडे, अरुणा एम. दसपुते (नलावडे) | 284-287 |
| 65 | मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम | प्रा.डॉ.गोपाल ढोले | 288-292 |




Scanned by TapScanner

Power of Knowledge Peer Review Journal,Volume : III, Issue :III Oct. to Dec. 2019 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286

# छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक आर्थिक नीतीचे अवलोकन

डॉ. संतोष तु. कुटे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्रीमती सींधुताई जाधव कला आणि विज्ञान महाव्रिद्यालय मेहकर जि. बुलढाणा

**गोषवारा :**

रयतेचे सुख हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे धोरण होते. शिवकालात प्रत्यक्ष शेतात राबणारा रयत हाच खरा शिवकालीन शेतीचा आधार होता व त्यांचा व्यवसाय हा समाजातील महत्वाचा मानला जात होता त्यांचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते तसेच शेतकऱ्यांच्या युवा पिढीतून सैन्य मिळत असे म्हणून शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या होत्या. त्यासाठी शिवाजी महाराजांनी जमिनीची योग्य प्रकारे मोजमाप करून त्या त्या मातीप्रमाणे जमीनीचे प्रकार करत वर्गवारी करून त्यावर पीक पाहणी करण्याची व्यवस्था केली होती आणि त्यावरच सारा आकारला जात असे छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या संदर्भात अनेक योजना राबविल्या त्या पत्रांमधून आपल्याला समजते. गावचा गाव फिरून तेथील शेतकरी जेवढे आहेत ते गोळा करून, कोणाकडे मनुष्यबळ आहे, बैल आहेत, कोणाकडे कशी व्यवस्था आहे याची विचारपूस केली जात असे.

शिवरायांच्या प्रशासनामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी समृध्द होते .शेतकऱ्यास रयत, कुणबी,कुळवाडी,अशा अनेक नावांनी संबोधले आहे. प्रत्यक्ष शेतावर कष्ट करणारा राबणारा शेतकरी हाच शिवकालीन शेतीचा आधार होता. पण त्याचा व्यवसाय हा समाजीतील प्रमुख व महत्वाचा मानला जात होता. कारण त्याचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते. म्हणुन सरकार सुध्दा शेतीच्या प्रश्नाविषयी जागृक होते. पाणीपुरवठयाच्या दृष्टिने जमिनीचे बागायत व जीरायत असे दोन प्रकार केले जात. छोटया छोटया ओढया नाल्यावंर किंवा नदयावर लहान लहान बंधारे घालुन त्यातील पाणी पाटांनी शेतीस पुरवले जाई. अशा जमिनीस पाटस्थल असे म्हणत. काही ठीकाणी विहीरीच्या पाण्यावर काही जमिण पीकवल जात असे. अशा जमिनीस मोटस्थलजमीण असे म्हणत. काही जमिणी छोटया छोटया ओढयांना बांधा घालुन जमिनीच्या उंचीचा फायदा घेवुन पाणी पुरवले जात असे. अशा जमिनीस फुग्याखालील जीम म्हटले जात असे. जिवनावश्यक धान्याचा तुटवडा पडत नसे, खाऊन पीऊन शेतकरी सुखी होता

यावरून छत्रपती शिवरायांच्या मनात रयतेविषयी ममता आत्मीयता दिसुन येते. म्हणून छत्र शिवराय १७ व्या शतकातील आदर्श राजे होते हे मान्य करावे लागेल. इ.स. १९२० मध्ये महाराष्ट्रात शेती विषयी अहवाल तयार करणारा इग्रज अधिकारी मेजर जर्व्हिस अहवालात म्हणतो 'शिव राज्यांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळेच विकास पावले, गोधंळ ,लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्व वृत्तिचा हा काळ असुनही शिवाजींच्या धोरणांमुळे महसुल व्यवस्था आणि जणता यांची स्थिती सुध या लोककल्याणकारी धोरणांमुळे छत्रपती शिवीजी महांरांना 'रयतेचा राजा ही उपाधी प्राप्त झाली

**प्रस्तावना :–** हिंदवी स्वराज्यांचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राजे . सुखी हे छ शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे धोरण होते. शिवकालात प्रत्यक्ष शेतात राबणारा रयत हाच

शिवकालीन शेतीचा आधार होता व त्यांचा व्यवसाय हा समाजातील महत्वाचा मानला जात होता त्यांचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते तसेच शेतकऱ्यांच्या युवा पिढीतून सैन्य मिळत असे म्हणून शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबवल्या होत्या. त्यासाठी शिवाजी महाराजांनी जमिनीची योग्य प्रकारे मोजमाप करून त्या त्या मातीप्रमाणे जमीनीचे प्रकार करत वर्गवारी करून त्यावर पीक पाहणी करण्याची व्यवस्था केली होती आणि त्यावरच सारा आकारला जात असे छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यां संदर्भात अनेक योजना राबवित हे काही पत्रांमधून आपल्याला समजते. ज्यांच्याकडे शेत कसण्याची कुवत आहे. मनुष्यबळ आहे पण मशागतीस बैलजोडी नाही बियाणे नाहीत त्याला दोनचार बैल व रोख रक्कम दयावी किंवा सरकारातून बैल आणि बियाणे दयावेत शेतकऱ्यास सरकारातून दिलेले कर्ज वाढीव पद्धतीने वसूल न करता त्याच्या शेतीचे उत्पन्न तयार झाल्यावर त्याच्या कुवतीनुसारहप्त्याने वसुल करावे. नवीन शेतकर्यास सोईसवलती देऊन पडिक जमीन लागवडीखाली आणावी त्यासाठी सरकारने रक्कम मंजूर करावी. ज्या शेतकर्यावर सरकारची मागील बाकी येणे आहे पण त्याच्याजवळ काहीच नाही अशा शेतकर्यास जर तो शेती करण्याची अजूनही उमेद धरत असेल तर त्यास सर्व प्रकारची मदत करावी त्याच्यावरील कर्ज माफ करण्यासारखे असेल तर ते माफ करावे अशा कल्याणकारी तरतुदी महारांजाच्या शासनव्यवस्थेत होत्या

**संशोधनाचे उद्दीष्ट** : – छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक आर्थिक धोरणांचे अध्ययन करणे.

**संशोधनाचे गृहीतक** :– छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेतीविषयक आर्थिक धोरणांमुळे महसुल व्यवस्था व जणतेची आर्थिक स्थिती सुधारली.

**संशोधन पद्धती**:प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे

**मुलकी शासनव्यवस्था** :

शिवकालीन लष्करी शासनव्यवस्था, मुलकी प्रशासन व्यवस्था, शासकीय न्यायव्यस्था वर्तमानकाळातही मार्गदर्शक अशीच आहे. कोणत्याही राज्याचा गावगाडा त्या राज्याच्या शेतीच्या चाकावर चालत असते.त्यातुन शिवकालीन कृषीव्यवस्था बाजुला काढता येणार नाही. कारण कृषी व्यवस्था त्या गावगाडयाचा एक अविभाज्य अंग आहे. 'रयत सुखी तर राजा सुखी, शेतकरी सुखी तर राजा सुखी हे शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे प्रधान सुत्र होते'. हे स्वराज्य शेतकऱ्यांच्या रयतेच्या कल्याणासाठी ही त्यांची भावना त्यांच्या अनेक आज्ञापत्रातून व्यक्त झालेली आहे म्हणूनच त्यांचे वर्णन इतिहासकारांनी शेतकऱ्यांचा राजा रयतेचा राजा असे केले आहे

प्राचीन काळापासूनच भारत कृषीप्रधान देश आहे. शेती विषयक धोरणावरच देशांचे अर्थकारण प्रामुख्याने अवलंबुन राहत असे. मध्ययुगीन काळातील सर्व समाजजीवन शेतीवरच अवलंबून होते. शेती हे उपजिविकेचे प्रमुख साधन असल्याने स्वत:च्या मालकीची जमिन संपादुन, शेती व्यवसाय करणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते असे .सर्वसाधारणपणे जमिनीवर खाजगी हक्क मान्य करण्यात आला असला तरी खाजगी लोकांच्या जमीनीशिवाय राज्याच्या मालकीच्या जमिनी देखिल असत. एकूण मध्यकाळात छत्रापती शिवाजी महाराजांच्या व्यतिरिक्त शेतकरी कल्याणाच्या दृष्टिने फारसे लक्ष दिल्याचे दिसत नाही.

## शिवकालीन शेतीचे स्वरूप

शिवकालीन शेतीचे पांढरी आणि काळी असे दोन भाग पडले होते. गावाची वसाहत पाढऱ्या मातीवर केली जात असे, ज्या जमिणीमध्ये पीक घेतले जात असे त्या जमिणीस काळी आई असे तर ज्या शेतीवर वसाहती वसत त्यास पाढरी आई असे म्हणत असत. शिवकालीन समाजात शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने या काळया आईस सर्वात महत्वाचे साधन मानले गेले. या काळया आईचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. प्रत्यक्ष लागवडीखाली असणारी पिकाची जमिण आणि नापीक पडीक जमिन अशा पडीक जमीनीचा वापर शेतकरी गुराढोरांना चराऊ राण म्हणुन वापरत. अशा राणास गायराण असे म्हणत एकुण सर्व जमिनीचे मालक सरकार असले तरी सरकार काही प्रत्यक्ष जमीण कसू शकत नाही. त्या करिता सरकारला जमीन शेतकऱ्याला मुदत मालकी हक्काने दयावी लागत असे शेतकरी त्या जमीनीचा मोबदला सरकारला खंड म्हणून भरत असे. म्हणजे रयत सारा सरकारला भरत असे . शासन काही जमीन धार्मिक संस्थांना इनाम म्हणुन देत असे. त्यावर सारा माफ असे. गावच्या जमीनीपैकी २० टक्के जमीन अशा पध्दतीने काही धार्मिक संस्थाना इनाम म्हणुन दिली जात असे. सरकारच्या धोरणानुसार कसण्याची जबाबदारी त्या शेतकऱ्यावर असे. सरकारच्या विरोधात वर्तन केल्यास ती इनामी जमीन काढुन घेतली जात असे .

जमिनीची लागवड करण्यासाठी लाख दोन लाख पर्यंत रक्कम खर्च करण्याची सुभेदाराला परवानगी होती. परंतू एखदा शेतकरी शेती करण्याची उमेद बाळगुन असला तर दुर्देवाने, दुष्काळामुळे, अस्मानी आपत्तीमुळे किंवा अन्य कारणामुळे जर तो मागील कर्जफेड करू शकला नाही व त्याची अडचण खरी असल्याने अधिकाऱ्याने महाराजांना पटवून दिले तर अशा शेतकऱ्याला मागील कर्जाची खंडमाफी दिली जाई. त्या असमर्थ शेतकऱ्याला सांभाळून घेवून त्याला लागवड करण्याकरता अर्थसाहाय्य केले जाई.श्शेतकऱ्याकडुन लागवड करून घेण्यासाठी शिवरायांनी केलेल्या अर्थसहाय्याची कल्पना येते.

## शेतकरी जीवन :

शिवरायांच्या प्रशासनामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी समृध्द होते .शेतकऱ्यास रयत, कुणबी, कुळवाडी, अशा अनेक नावांनी संबोधले आहे. प्रत्यक्ष शेतावर कष्ट करणारा राबणारा शेतकरी हाच शिवकालीन शेतीचा आधार होता. पण त्याचा व्यवसाय हा समाजीतील प्रमुख व महत्वाचा मानला जात होता. कारण त्याचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते. म्हणन सरकार सध्दा शेतीच्या प्रश्नाविषयी जागृक होते. पाणीपुरवठयाच्या दृष्टिने जमिनीचे बागायत व जीरायत असे दोन प्रकार केले जात. छोटया छोटया ओढया नाल्यावंर किंवा नदयावर लहान लहान बंधारे घालुन त्यातील पाणी पाटांनी शेतीस पुरवले जाई. अशा जमिनीस पाटस्थल असे म्हणत. काही ठीकाणी विहीरीच्या पाण्यावर काही जमिण पीकवली जात असे. अशा जमिनीस मोटस्थलजमीण असे म्हणत. काही जमिणी छोटया छोटया ओढयांना बांधारा घालुन जमिनीच्या उंचीचा फायदा घेवुन पाणी पुरवले ,जात असे. अशा जमिनीस फुग्याखालील जीमण म्हटले जात असे. जिवनावश्यक धान्यांचा तुटवडा पडत नसे, खाऊन पीऊन शेतकरी सुखी होता .

## शेतजमिनीची मोजनी:

शिवकाळात शेतीची मोजणी हा महत्वाचा घटक मानला होता. जमिण मोजणीसाठी काठीचा



Scanned by TapScanner

वापर केला जात होता. या काठीला ' शिवशाहीकाठी' असे म्हणतात. ही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे. एक हात सात मुठीचा व एक मुठ दोन तसुची असे याप्रमाणे प्रमाण माणले जाई . एक मुठ म्हणजे अगठयाजवळचे बोट व करंगळीमधील अंतर एक तसु म्हणजे दोन बोटाच्या सांध्यातील अंतर मानले जाई. अशा प्रकारे पाच हात व पाच साध्यातील अंतर मानले जाई. अशा प्रकारे पाच हात व पाच मुठी यांनी बनलेल्या विस चौरस काठयांना मिळुन एक पांड होई आणि अशा विस पांडाचा मिळुन एक बिधा होई. 'एकशेविस चौरस बिघे मिळुन एक चावर होई'. कोकणात विस औरस–चौरस पाडाऐवजी तेविस औरस चौरस पांडाचा एक बिघा मानला जाई. सरकारी अधिकाऱ्यांबरोबर जमिन मोजनिचे काम वतनदार तराळ करीत असे. त्याच्या हाती ही मोजनिची काठी असे व तो जमिन मोजत असता काठी उडवित असे. त्यामुळे या काठीस त्याकाळी चालती काठी असे म्हणत. अशा प्रकारे काठी उडी घेत असल्यामुळे बिघ्यातील काठयांची संख्या सर्वत्र सारखीच राहते असे नाही. तेव्हा लांब दोर ६ रून अंतर सारखे केले जात असे.९

## शेतीविषयक धोरण

छत्रपती शिवाजी महाराज हे लोकांचे रयतेचे राजे होते. त्यांनी शेतकऱ्यांची कुळांची उद्‌वस्त परिस्थिती जवळून पाहीली होती. म्हणून त्यांनी स्वराज्यात शेती धोरणात अमूलाग्र सुधारणांद्वारे नवे परिवर्तन घडवण्याच्या प्रयत्नांना सुरवात केली. आदीलशाही कुतुबशाही आणि मुघल साम्राज्यात शेतकऱ्यांकडुन उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त सारा वसुल करत या पार्श्वभुमीवर शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात नवे शेतसारा धोरण आखतांना अवलंबलेला दृष्टिकोन सर्व प्रजाजनास, मग तो कोणत्याही धर्माचा असो एका समान तत्वाने वागवणारा होता. त्यांनी अन्याय व जुलुमजबरदस्ती करणारे शेंडीपट्टी, लग्नपट्टी, तुपपट्टी, जंगमपट्टी, जिझीया कर असे इतर कर बंद केले. यामागे सर्व जाती धर्माच्या लोकांचे प्रेम आणि सहकार्य मिळवावे, ही त्यांची इच्छा होती. बिघावणी म्हणजे बिघ्याच्या परिमाणात जमिन मोजनी करून उत्पन्न निश्चित करण्यास सुरवात केली याच बरोबर पुण्या–सभोवतालच्या प्रदेशात धरणे–बंधारे बांधून कालव्याने जमिनींना पाटाच्या पाण्याच्या पुरवठा केला अशा तऱ्हेने राज्यातील बागाईत क्षेत्र वाढवले. इ.स. १६६७– १६६९ मध्ये शिवाजी महाराजांनी आपले लक्ष जमिन महसुलाच्या व्यवस्थेकडे वळवले अचुक जमिन मोजण्यासाठी करण्यासाठी अण्णजी दत्तोयाची नेमनुक केली. अणाजीने जीमणिची नव्याने मोजनी करून प्रतवारी प्रमाणे सुपीकतेवर अव्वल दुव्वल सिम, चतुर्थ दर्जाची जमिण अशी विभागणी केली. इतर राजवटीत रूढ असलेला ५० टक्क कर कमी करून हा फरक ३३ टक्क्यांवर आणि तोही उत्पन्नांवर निश्चित केला. अशा पध्दतीने अन्यायकारी जबरदस्तीने लादलेल्या करांपासुन रयतेचे रक्षण करून पारदर्शक सुलभ कररचना निर्माण केली. त्यामुळे सर्व रयत त्यांच्या सर्व योजनांना चांगला प्रतिसाद देई. स्वराज्याच्या उभारणीसाठी मोठा फंड जमा करत गेली. रयतेवर प्रचंड कर लादुन अन्यायपुर्वक सरकारी खजीना भरण्यासपेक्षा विविध सुधारणा करणे आणि विविध सवलती देवुन माफक तसेच योग्य क्रमाने सरकारी उत्पन्न वाढविणे याचा आदर्श शिवरायांनी साडेतीनशे वर्षापुर्वी घालून दीला. तो आजही प्रेरणादाई आहे.१शेतकऱ्यांसमोरील समस्या आणि त्यांच्यावर कोसळणाऱ्या आपत्ती याबाबत छत्रपती शिवरायांनी अनेक नव्या योजना सुरू केल्या . त्यांनी

330



Scanned by TapScanner

घडवुन आनलेली. आणखी एक महत्वाची सुधारणा म्हणजे पडीक असलेल्या जमिनी पुन्हा लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यास दीलेल्या सवलती शेतकऱ्यांना मोफत बैलजोडी, शेतीसाठी आवश्यक असलेली नांगर कुळव आदी अवजारे मोफत पुरविणे असे उपक्रम त्यांनी राबविले. सगळयात महत्वाच म्हणजे पोटाची भ्रांत आहे. त्यांना खंडी दोन खंडी धान्य देवुन सहा महीण्याच्या पोटाची बेगमी केली. अशा पद्धतीने देशातील निष्कीर्य झालेला समाज कार्याला जुंपून त्यांच्या माध्यमातुन पडीक पडलेली सर्व जमीन पुन्हा लागवडीखाली आणुन रयतेचे आणि राज्याचे उत्पन्न वाढविले. पुन्हा ऐकदा संपन्न शेतीच्या माध्यमातुन सुवर्ण, समृध्दभारत निर्माण करण्याचा घाट घातला.

आपल्या अधिकाऱ्याकडुन रयतेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होवु नये यासाठी शिवाजी महाराज खुप सर्तक होते. १६७६ मध्ये प्रभावळी मामल्याच्या सुभेदाराला पाठवलेल्या आज्ञापत्रात छत्रपती शिवराय लिहितात. तु इमाणे इतबारे साहेब काम करावे. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात न लावता रास्त व दुरूस्त वर्तने, रयतेवर कडीचा जूलूम केलीया साहेब तुजवर राजी नही ऐसे समजणे .राज्यात सैन्याचा हालचाली प्रसंगी आपल्या फौजेकडुन रयतेला कोणत्याही प्रकारची तोशिस लागू नये. याविषयी शिवराय फार सक्त होते.

इ.स. १६७४ मध्ये आपल्या जुमलेदार हवालदार इ. लष्करी अधिकाऱ्यांना पाठवलेल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराज लिहीतात. लष्करासाठी बेगमी केलेले अन्न, धान्य गुरांचा चारा बेफिकीरपणे वापराल मग संपल्यावर रयतेस तजविज देवु लागाल. सैन्यानी शेतकऱ्यांकडुन धान्य ,भाकरी, गवत ,फाटी, भाजी आणु लागले तर रयत उपाशी मरेल. यावरून छत्रपती शिवरायांच्या मनात रयतेविषयी ममता आत्मीयता दिसुन येते. म्हणून छत्रपती शिवराय १७ व्या शतकातील आदर्श राजे होते हे मान्य करावे लागेल. इ. स. १९२० मध्ये महाराष्ट्रातील शेती विषयी अहवाल तयार करणारा इग्रज अधिकारी मेजर जर्व्हिस अहवालात म्हणतो 'शिवाजी राज्यांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळेच विकास पावले, गोधंळ ,लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्वत्रिक वृत्तिचा हा काळ असुनही शिवाजींच्या धोरणांमुळे महसुल व्यवस्था आणि जणता यांची स्थिती सुधारली या लोककल्याणकारी धोरणांमुळे छत्रपती शिवीजी महारांना 'रयतेचा राजा ही उपाधी प्राप्त झाली.

निष्कर्ष :

१. शेती व शेतकरी हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासनव्यवस्थेचा केंद्रबिंदु असल्याचे निदर्शनास येते.

२. रयेत सुखी तर राजा सुखी अर्थात शेतकरी सुखी तर राजा सुखी हे महाराजांच्या राज्य कारभाराचे प्रधान सुत्र होते. महाराजांच्या शासनव्यवस्थेत शेतकरी सुखी जीवन जगत होता.

३. दुष्काळ किंवा असमानी अपत्तीच्या वेळी शेतकऱ्यांचे संपुर्ण कर्ज माफ करून नव्याने लागवडी करीता अर्थसाहाय्य दिले जात असे. यावरून महाराजांचा शेतकऱ्याप्रतिचा दृष्टिकोण निदर्शनास येतो.

४. महाराजांच्या शासनव्यवस्थेत शेतीला पाणी पुरवठा करण्याकरीता उत्तम प्रणीलीचा वापर केला जात असे.



Scanned by TapScanner

पाणी पुरवठयांच्या सुविधेनुसार पाटस्थल जमीन, मोटस्थल जमीन, फुग्याखालील जमीन असे वर्गीकरण करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

५. शिवकाळात शेतीची मोजणी उत्तम प्रकारे केली जात असे. त्या करीता मापक म्हणून शिवशाही काठीचा वापर केला जात असे.

६. रयतेवर प्रचंड कर लादुन अन्यायपुर्वक सरकारी खजिना भरण्यापेक्षा विविध सुधारणा करणे आणि विविध सवलती देवून माफक तसेच योग्य कराने सरकारी उत्पन्न वाढविणे यांचा आदर्श शिवरायांनी साडेतिनशे वर्षापुर्वी घालुन दिला. तो आजही प्रेरणादायी आहे.

**सारांश:–**

शिवरायांच्या प्रशासनामुळे शेतकऱ्यांचे जीवन सुखी समृध्द होते. शेतकऱ्यास रयत, कुणबी,कुळवाडी,अशा अनेक नावांनी संबोधले आहे. प्रत्यक्ष शेतावर कष्ट करणारा राबणारा शेतकरी हाच शिवकालीन शेतीचा आधार होता. पण त्याचा व्यवसाय हा समाजीतील प्रमुख व महत्वाचा मानला जात होता. कारण त्याचे उत्पन्न हेच राज्याचे उत्पन्न होते. म्हणुन सरकार सुध्दा शेतीच्या प्रश्नाविषयी जागृक होते. पाणीपुरवठयाच्या दृष्टिने जमिनीचे बागायत व जीरायत असे दोन प्रकार केले जात. छोटया छोटया ओढया नाल्यावंर किंवा नदयावर लहान लहान बंधारे घालुन त्यातील नाणी पाटांनी शेतीस पुरवले जाई. अशा जमिनीस पाटस्थल असे म्हणत. काही ठीकाणी विहीरीच्या पाण्यावर काही जमिण पीकवली जात असे. अशा जमिनीस मोटस्थलजमीण असे म्हणत. काही जमिणी छोटया छोटया ओढयांना बांधारा घालुन जमिनीच्या उंचीचा फायदा घेवुन पाणी पुरवले जात असे. अशा जमिनीस फुग्याखालील जीमण म्हटले जात असे. जिवनावश्यक धान्याचा तुटवडा पडत नसे, खाऊन पीऊन शेतकरी सुखी होता.

यावरून छत्रपती शिवरायांच्या मनात रयतेविषयी ममता आत्मीयता दिसुन येते. म्हणून छत्रपती शिवराय १७ व्या शतकातील आदर्श राजे होते हे मान्य करावे लागेल. इ.स. १९२० मध्ये महाराष्ट्रातील शेती विषयी अहवाल तयार करणारा इग्रज अधिकारी मेजर जर्व्हिस अहवालात म्हणतो 'शिवाजी राज्यांचे राज्य जनतेच्या सहकार्यामुळेच विकास पावले, गोधंळ ,लढाया आणि द्रोह करण्याच्या सार्वत्रिक वृत्तिचा हा काळ असुनही शिवाजींच्या धोरणांमुळे महसुल व्यवस्था आणि जणता यांची स्थिती सुधारली या लोककल्याणकारी धोरणांमुळे छत्रपती शिवीजी महारांना 'रयतेचा राजा ही उपाधी प्राप्त झाली.

**संदर्भ ग्रंथ :**

१. प्रा. बिरादर टि.के. मराठयांचा इतिहास विद्याभारती प्रकाशन २०००
२. डॉ. पवार दत्ता त्रैमासीक भारतीय इतिकास आणि संस्कृती, मुबंई ऑक्टो–डिसेंबर २००७
३. शिवचरित्र साहित्य खंड
४. कुलकर्णी अ.रा./ खरे ग.ह. मराठयांचा इतिहास खंड १ कॅन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर
५. कुलकर्णी अ. रा.शिवकालीन महाराष्ट्र राजहंस प्रकाशन पुणे १९९३
६. भुरले स. ल. पुणे रिसर्चटाईम जानं – मार्च २०१७



Smt. Sindhutai Jadhav Mahavidyalaya Mehkar 330
Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao Colle
Mehkar.Dist.Buldana
Scanned by TapScanner